कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई
दिनांक ११/११/२०२६

''प्रेस नोट''

कांदिवली पोलीस ठाणे हद्दीत वृध्द महिलेची सोन्याची चैन बळजबरीने खेचुन पळुन गेलेल्या आरोपीतांना अटक केलेबाबत...

दिनांक ०६/११/२०२६ रोजी कांदिवली पोलीस ठाणेच्या हद्दीत महिला वृध्द महीला मार्केट मधुन घरी येत असताना त्यांना रस्ता क्रॉस करण्यास मदत करणा-या अनोळखी चोरटयाने त्यांच्या घरापर्यत येवुन त्या बसल्या असताना त्यांचा पाठलाग करुन त्यांच्या गळयातील सोन्याची चैन जबरदस्तीने खेचुन चोरी करुन पळुन गेल्याने फिर्यादींच्या तक्रारीवरुन कांदिवली पोलीस ठाणे गुरक्र. १४५०/२०२६, कलम ३०९(४) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

जबरी चोरी झालेली मालमत्ता:- रु. २,००,०००/- किंमतीची एक सोन्याची जुनी चैन वजन अंदाजे १७ ग्रॅम.

तपास:- गुन्हयाची माहिती मिळताच मा. पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ- २, बोरीवली, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध घेणेकामी कांदिवली पोलीस ठाणेची तीन पोलीस पथके तयार केली. सदर पथकतील अधिकारी व अंमलदार यांनी नमुद गुन्हयाच्या घटनास्थळ व परिसरातील तांत्रीक तपास केला. सदर तपासादरम्यान कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७६०/२०२६, कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये मोटार सायकल चोरीचा गुन्हा दाखल असल्याची बाब कांदिवली पोलीस ठाणेच्या पथकाला समजुन आली. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणेकडुन नमुद गुन्हयाचा शोध घेणेकामी पोलीस पथक तयार केले होते.

त्यानंतर कांदिवली व कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणेची चार स्वतंत्र पथकांनी नमुद गुन्हयांचा तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार च्या मदतीने नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी निष्पन्न केले. दिनांक ०९/११/२०२६ रोजी पाहिजे आरोपी रात्रीच्या सुमारास दादर रेल्वे स्टेशन परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरुन दोंन्ही आरोपीतांना दादर रेल्वे स्टेशन येथे सापळा रचुन कौशल्यपुर्ण तपासाअंती दादर रेल्वे स्टेशन येथुन ताब्यात घेण्यात आले.

आरोपीताचे नांव व पत्ता:-

१) प्रमोद प्रभाकर जठार वय ४३ वर्षे, धंदा-नाही, राठी- रुम लं ०७, ४ था माळा, सनशाईन गार्डन, नालासोपारा (पूर्व), जि-पालघर

२) मोहमद शाहिद अलादिन खान वय ४७ वर्षे, धंदा- ड्रायव्हर (टेम्पो चालक), राठी- आझाद नगर, गेट नं ०८, अंबुजवाडी, मालवणी, मालाड (प), मुंबई

दोन्ही आरोपीतांकडे नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने केलेल्या अधिक चौकशीत त्यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने नमूद गुन्हयात त्यांना अटक करण्यात आली. नमुद आरोपीतांकडे तपास करुन गुन्हयातील जबरी चोरी केलेली मालमत्ता रु. २,००,०००/- किंमतीची एक सोन्याची जुनी चैन वजन अंदाजे १७ ग्रॅम तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली व कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे येथुन चोरीस गेलेली मोटार सायकल हि जप्त करण्यात आली.

कांदिवली व कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणेच्या तपास पथकांनी गुन्हा नोंद झाल्यापासुन अथक परिश्रम व कौशल्यपुर्वक तपास करुन उल्लेखनिय कामगीरी केली आहे व जनमानसात सुरक्षिततेची भावना निर्माण करुन बृहन्मुंबई पोलीस दलाची प्रतिमा उंचावली आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त बृन्हमुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का.व सु.), मा. श्री. शशिकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-२, मा. श्री. संतोष धनवटे, सहायक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. करण सोनकवडे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, श्री. शेखर शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि श्री. संदीप गोरडे, पोउनि श्री. निलेश पाटील व पोउनि श्री. नानासो घाडगे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथक त्याचप्रमाणे कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणेचे श्री. बाळासाहेब बनकर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, सपोनि राहुल पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी पार पाडली आहे.